महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/१२६८/२०२६-२७ दि:-१०/०७/२०२६

# परिपत्रक

**विषय:- महाज्योती संस्थेमार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण योजनांकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मुदतवाढ.**

महाज्योती संस्थेमार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या कर्मचारी निवड आयोग, IBPS Banking/LIC/AAO, रेल्वे भरती, मिलिटरी/पोलीस भरती, शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी, MBA CAT/CMAT-CET, UGC NET/CSIR/MH-SET, GRE/TOFEL/IELTS & Foreign Language परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थ्यांकडून दि.१९/०६/२०२६ रोजी महाज्योतीच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करून दि.१०/०७/२०२६ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.

तथापि सदर योजनांकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांनी मुदतवाढ देण्याकरिता महाज्योती कार्यालयाच्या कॉल सेंटरला विनंती केलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या कार्यालयास केलेली विनंती विचारात घेता सदर योजनांकरिता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी दि.१७/०७/२०२६ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केलेला आहे परंतु चाळणी परीक्षेसाठी प्राधान्यक्रम निवडलेला नाही अशा विद्यार्थ्यांना चाळणी परीक्षेसाठी प्राधान्यक्रम निवडण्याकरिता सूचना निर्गमित करण्यात येत आहे, सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**